महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र.८६३४ दि.-०६/०३/२०२४

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – २६ / ०२ /२०२४ दिनांक – सकाळी ११.३० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

प्रति,

**श्री. आश्रू नामदेव खवळे**
**५४ एफ पी डॉ. राममनोहर लोहियानगर**
**मुख्य अग्निशमन दलासमोर प्राचीन म्हसोबा**
**मंदिर जवळ पुणे – ४११०४२** } अपिलार्थी

श्रीमती श्रुती नाझीरकर
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } जनमाहिती अधिकारी तथा सहा अधीक्षक वृक्ष प्राधिकरण

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री आश्रू नामदेव खवळे माहिती अधिकारातीलयांचा मा (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) २३ /०१ /२०२४ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहा.उद्यान अधिक्षक,वृक्ष प्राधिकरण विभाग, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र.१०१६९ दि. २३ /०१ /२०२४ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

**माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील**

| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| २१ /१२/२०२३ | आ क्र ९०५९<br>२१ /१२ /२०२३ | २० /०१ /२०२३ | जा क्र – ७४३१<br>१७ /०१ /२०२३ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती देण्यात आलेली आहे.त्यांना माहिती मुदतीत मिळाली नाही त्यामुळे अपीलार्थी त्यांचा अपिल अर्ज दिनांक २३/०१/२०२४ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला.

**अपिल अर्जाचा तपशील**

| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| २३ /०१/२०२४ | २३ /०१ /२०२४ | अपिल अर्ज मुदतीत आहे |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि. २६ /०२ /२०२४ रोजी सकाळी ११.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –

| अ.क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | सन १९९६ नंतर आपल्या अधिकारातील जमिनीवरील सर्व विद्यमान झाडाची गणना किती वेळा केली आहे. शेवटच्या गणणेवेळी आपल्या कार्यक्षेत्रातील जमिनीवरील झाडांची संख्या किती होती. | बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय जा क्र ७१२५ दिनांक ८/१/२४ अन्वये अर्ज जनमाहिती अधिकारी वृक्ष प्राधिकरण विभाग घोले रोड क्षेत्रीय कार्यालय यांना हस्तांतरित करण्यात आला आहे. |
| २ | महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण आणि जतन अधिनियम १९७५ च्या प्रकरण (पाच) कलम ८ पोटकलम (३) ख अन्वये वृक्ष प्राधिकरणाने सन २०१७ पासून प्रत्येक सहा महिन्यात किती झाडे तोडण्याची परवानगी दिली याचा अहवाल सर्वसाधारण सभे मध्ये प्रत्येक सहा महिन्याला सादर केला आहे का २०१७ पासून किती झाडे तोडण्यास परवानगी दिली याची संख्या द्यावी. | |
| ३ | महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण आणि जतन अधिनियम १९७५ च्या तरतुदीचा भंग करून आपल्या प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात २०१७ ते २०२३ अखेर पर्यंत किती लोकांनी झाडे तोडली अशा बेकायदेशीररित्या झाडे तोडल्या गेलेल्या झाडांची संख्या किती व अशा लोकांवर कोणती कारवाई झाली तसेच किती रुपये दंड वसूल झाला दंडापोटी जमा झालेल्या रक्कमेचा आपण कशाप्रकारे विनियोग केला. | बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय जा क्र ७१२५ दिनांक ८ /१/२४ अन्वये अर्ज जनमाहिती अधिकारी वृक्ष प्राधिकरण विभाग घोले रोड क्षेत्रीय कार्यालय यांना हस्तांतरित करण्यात आला आहे.<br>बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ऑक्टोबर २०१८ ते २०२३ अखेर अनधिकृत वृक्षतोड संदर्भात एकूण ७ दावे दाखल असून ते न्यायप्रविष्ट आहेत. उपरोक्त कालावधीत दंड वसूल करणेबाबत कोणतेही आदेश प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. |
| ४ | अर्जदारांना झाडे तोडण्याच्या बदल्यात अर्जदारांना किती व कोठे पर्यायी झाडे लावण्यासंबधीचे/दत्तक संबधीचे आदेश देण्यात आले. प्राधिकरणाने जतन करण्याचा आदेश दिलेली नवीन झाडे खरेच जतन केली आहेत का नसल्यास अश्या अश्या किती अर्जदारांची ठेव रक्कम प्राधिकरणाने जप्त केली आहे. | अशा स्वरुपाची माहिती इकडील कार्यालयाकडे उपलब्ध नाही. |

**विवेचन**

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक २६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री आश्रू नामदेव खवळे उपस्थित होते. सदर दिनांकास श्रीमती श्रुती नाझीरकर जन माहिती अधिकारी तथा सहा उद्यान अधिक्षक वृक्ष प्राधिकरण बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्री भारत गायकवाड सहा जनमाहिती अधिकारी तथा व्हरटीकल्चर मिस्त्री वृक्ष प्राधिकरण बिबवेवाडी कार्यालय, उपस्थित होते.

अपिलार्थी श्री आश्रू नामदेव खवळे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) व कलम ७ (१) अन्वये माहिती मुदतीत दिली नाही त्यामुळे अपिल अर्ज दाखल केला असल्याचे विवेचनात नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र १,२ व ३ करिता अर्ज जनमाहिती अधिकारी वृक्ष प्राधिकरण विभाग यांना जा क्र ७१२५ दि.८ /१/२०२४ अन्वये वर्ग केल्याचे सांगितले व इकडील कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदार अपिलार्थी यांना जा क्र ७४३१ दि.१७/१/२०२४ नुसार पोस्टाने पाठविल्याचे सांगितले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'</u>

पुढील प्रमाणे पारित आदेशानुसार,जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी इकडील कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य अपिलार्थी यांना १५ दिवसाच्या आत माहिती द्यावी. व मुद्दा क्र १ व २ ची माहिती / जनमाहिती अधिकारी सदस्य सचिव कार्यालय वृक्ष प्राधिकरण यांनी परस्पर अपिलार्थी अर्जदार यांना १५ दिवसाच्या आत माहिती विनामूल्य द्यावी. असे आदेश देण्यात येत आहे.

( प्रदीप आव्हाड )
**अपिलीय अधिकारी तथा**
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगपालिका

<u>टिप –</u>

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे **खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत,** ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत **माहिती अधिकार अधिनियम** २००५ नुसार तरतूद आहे. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org**या संकेतस्थळावर** उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. **श्रीमती श्रुती नाझीरकर,जनमाहिती** अधिकारी तथा सहा उद्यान अधिक्षक वृक्ष प्राधिकरण विभाग **बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका**

२. **श्री भारत गायकवाड सहा जनमाहिती** अधिकारी तथा व्हटीकल्चर मिस्त्री वृक्ष प्राधिकरण विभाग **बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका**

३. **जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक** उद्यान अधीक्षक सदस्य सचिव कार्यालय वृक्ष प्राधिकरण पुणे **महानगरपालिका**